**ठळक बातम्या**

- रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर जैसे थे, महागाई दराचा अंदाज आणखी घटवला
- उत्तराखंडमधे पुरात ११ जवान बेपत्ता, तर १३० नागरिकांना वाचवण्यात यश; महाराष्ट्रातले ५१ नागरिक सुरक्षित
- नवी दिल्लीतल्या कर्तव्य भवनाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- भारतानं रशियाकडून खनिज तेल आयात बंद केल्याचा अमेरिकेचा दावा  रशियानं फेटाळला

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं पतधोरण आढाव्यानंतर व्याजदर जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळं रेपो दर साडे ५ टक्क्यांवर कायम राहणार आहे. याशिवाय इतरही दर जैसे थे राहणार आहे.

चालू आर्थिक वर्षात महागाई दर आणखी कमी होऊन ३ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले. जूनमध्ये वर्तवलेल्या अंदाजात हा दर ३ पूर्णांक ७ दशांश टक्के राहील, असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं होतं. खाद्यपदार्थांच्या दरात होत असलेली घसरण, शेती क्षेत्रात झालेल्या सुधारणा यामुळं महागाई दराचा अंदाज कमी केल्याचं ते म्हणाले. आर्थिक वृद्धी दर साडे ६ टक्क्यांवर कायम राहील, असंही गव्हर्नर म्हणाले.

जुलै ते सप्टेंबर दरम्यान रिझर्व्ह बँक सर्व ग्रामपंचायतीमध्ये मेळावे आयोजित करणार आहेत. यात बँक खाती उघडणं, पुन्हा केवायसी करणे, वीमा आणि निवृत्ती वेतन योजना यासारख्या सुविधा मिळतील, अशी माहिती गव्हर्नरांनी दिली. खाते धारकाचा मृत्यू झाल्यावर त्यांच्या बँकेतल्या लॉकरमधल्या वस्तू वारसांना

सुलभरितीने काढता याव्यात याची प्रक्रीया आणखी सुलभ आणि सोपी करणार असल्याचं ते म्हणाले. सर्वसामान्य नागरिकांना SIP च्या माध्यमातून ट्रेझरी बिलमध्ये गुंतवणूक करण्याची सुविधाही लवकर उपलब्ध करुन देऊ, असं गव्हर्नरांनी सांगितलं.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये झालेल्या भीषण ढगफुटीमुळे आलेल्या पूरस्थितीत सेनेचे ११ जवान बेपत्ता झाले आहेत, अशी माहिती राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे मोहसिन शहीदी यांनी दिली. राष्ट्रीय तसंच राज्य आपत्ती प्रतिसाद दलासह लष्कराची पथकं युद्धपातळीवर मदत आणि शोधकार्य करत आहे. आतापर्यंत १३० जणांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं असून त्यांच्यासाठी अन्न, पाणी आणि औषधाची सोय करण्यात आली आहे. उत्तराखंडमधे पुरात अडकलेल्या नागरिकांमधे महाराष्ट्रातल्या ५१ नागरिकांचा समावेश आहे. त्यांचा नातेवाईकांशी संपर्क झाला असून ते सुखरूप असल्याचं राज्य आपत्कालीन कार्य केंद्रानं म्हटलं आहे.

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे उत्तराखंडच्या विविध भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. तसंच डोंगराळ भागात अनेक ठिकाणी भूस्खलनामुळे रस्ते बंद झाले आहेत. दरम्यान, उत्तराखंडमधे येत्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणात पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत कर्तव्यपथावर बांधण्यात आलेल्या कर्तव्य भवनाचं उद्घाटन झालं. सेंट्रल व्हिस्टा इमारत संकुलाचा व्यापक विस्तार करून कर्तव्य भवनाची तिसरी इमारत उभारण्यात आली आहे. प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणि गतीमानता आणण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या केंद्रिय सचिवालयांच्या इमारतींमधली ही पहिली इमारत आहे. या इमारतीत गृह, परराष्ट्र व्यवहार, ग्रामीण विकास, एमएसएमइ, तेल आणि नैसर्गिक

वायू यासारख्या काही प्रमुख मंत्रालयांची कार्यालयं असतील. दरम्यान, यानिमित्त आज संध्याकाळी साडे सहा वाजता आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री उपस्थितांना संबोधित करतील.

**<><><><><>**

विरोधी पक्षानं वेगवेगळ्या मुद्द्यांवरून केलेल्या घोषणाबाजीनंतर संसदेच्या दोन्ही सदनांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

दुपारच्या सत्रात केंद्रीय जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी समुद्रातून मालाची वाहतूक विधेयक २०२५ लोकसभेत मांडलं. मात्र विरोधकांच्या गदारोळ सुरु राहिल्यानं सदनाचं कामकाज उद्या सकाळपर्यंत स्थगित करण्यात आलं.

त्यापूर्वी लोकसभेचं कामकाज सकाळी ११ वाजता सुरु झालं तेंव्हा सभापती ओम बिर्ला यांनी हिरोशिमा दिनानिमित्त १९४५ मध्ये जपान देशात झालेल्या अणुबॉम्ब हल्यात मरण पावलेल्याना आदरांजली वाहिली. तसंच,
सदनाचे माजी सभापती गुरदयाल सिंग धिल्लो यांना त्यांच्या जयंतीनिमित्त पुष्पांजली अर्पण केली.

**राज्यसभेत** दुपारच्या सत्रात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२५-२६ या वर्षासाठी मणिपूर राज्याच्या अंदाजे खर्च आणि उत्पन्नाचं निवेदन सादर केलं. मात्र विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे सदनाच कामकाज उद्या सकाळपर्यंत स्थगित करण्यात आलं.

त्यापूर्वी, राज्यसभेत कामकाज सुरु झाल्यावर सर्व सदस्यांनी सदनाचे माजी सदस्य, माजी राज्यपाल दिवंगत सत्यपाल मलिक यांना आदरांजली वाहिली.

**<><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. वैजापूर तालुक्यातल्या श्रीक्षेत्र देवगाव शनी इथं आज योगिराज सद्गुरु गंगागिरीजी महाराज यांच्या १७८ व्या अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यात ते सहभागी होणार आहेत.

**<><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या नांदणी मठातल्या महादेवी हत्तिणीसंदर्भात वनतारा संस्थेच्या पथकाशी सविस्तर चर्चा केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली आहे. महादेवीला मठात परत आणण्यासाठी राज्य सरकारतर्फे दाखल करण्यात येणाऱ्या सर्वोच्च न्यायालयातल्या पुनर्विचार याचिकेत वनतारा पक्षकार म्हणून सहभागी व्हायला तयार असल्याचंही फडनवीस आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत. राज्य सरकारच्या वन विभागाने निवडलेल्या नांदणीजवळच्या जागेवर महादेवीसाठी पुनर्वसन केंद्र बांधण्याची तयारीही वनताराच्या पथकाने दर्शवल्याचं मुख्यमंत्री म्हणाले आहेत.

**<><><><>**

मराठा आणि कुणबी एकच असून याबाबतचा निर्णय सरकारने तातडीने घ्यावा अन्यथा पुन्हा मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. सोलापूर इथे दौऱ्यावर असताना ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. यापूर्वी आपण मुंबईला गेलो होतो, त्यावेळी सरकारने आरक्षणाचं आश्वासन देऊन परत पाठवलं होतं. मात्र, सरकारने आपली फसवणूक केली असून आता २९ ऑगस्ट रोजी आपण आंदोलन करण्यावर ठाम राहणार असल्याचं जरांगे यावेळी म्हणाले.

**<><><><>**

भारताने रशियाकडून खनिज तेल आयात बंद केल्याचा  अमेरिकेचा दावा रशियानं फेटाळला असून कोणत्याही सार्वभौम देशाला त्याच्या राष्ट्रीय हितासाठी व्यापार भागीदाराची स्वतंत्रपणे निवड करण्याचा अधिकार असल्याचंही रशियानं म्हटलं आहे. रशियन प्रशासनाचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी काल मॉस्कोमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत अमेरिका भारतावर दबाव आणत असल्याचा आरोप केला. भारत रशियाकडून खनिज तेल विकत घेऊन त्याची पुनर्विक्री करत असल्याबद्दल भारतावर वाढीव आयात शुल्क लादण्याचा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच दिला होता, त्या पार्श्वभूमीवर रशियानं ही प्रतिक्रिया दिली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल उद्या रशियात मॉस्को इथे वरिष्ठ रशियन अधिकाऱ्यांबरोबर भारत-रशिया सुरक्षा सहकार्यावर चर्चा करण्यासाठी बैठक घेणार आहेत. रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे भारतीय वस्तुंवर २५ टक्के कर वाढवण्याचा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर ही बैठक होणार आहे. या बैठकीत डोवाल रशियाकडून इंधन तेल खरेदी तसंच प्रधानमंत्री मोदी आणि अध्यक्ष पुतिन यांच्या आगामी बैठकीविषयी चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज झारखंडमधल्या चाईबासा विशेष न्यायालयासमोर हजर राहतील. गृहमंत्री अमित शहा यांच्याविरोधात २०१८ मधे केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल त्यांच्यावर खटला दाखल आहे. याआधी न्यायालयाने गांधी यांच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केलं होतं.

**<><><><><>**

झारखंडमधल्या कामदारा इथं काल रात्री पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत मार्टीन केरकट्टा हा नक्षलवादी ठार झाला. त्याच्यावर पंधरा लाख रुपयांचं इनाम होतं. सुरक्षा दल जिल्हा पोलीस दल या भागात शोधमोहीम राबवत आहेत. घटनास्थळावरून  मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र आणि दारूगोळा जप्त करण्यात आला.

**<><><><><>**

धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज एका पोलीस कर्मचार्यानं  स्वतःवर गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केला. जखमी पोलीस कर्मचाऱ्याला भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आलं  आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचं पथक घटनास्थळी दाखल झालं असून ते पुढील तपास करत आहेत.

**<><><><><>**

हिंगोली रेल्वे स्थानकावर उभ्या असलेल्या बोगीला आज सकाळी आग लागली. या आगीत बोगी संपूर्णतः जळून खाक झाली. हिंगोली रेल्वेस्थानकावर गेल्या काही महिन्यांपासून तीन बोगी उभ्या होत्या. या बोगीतून आगीचे लोट आणि धूर बाहेर निघत असल्याचं रेल्वे अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या निदर्शनाला  आल्यानं अग्निशमन दलाला बोलावण्यात आलं. सुमारे एक तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली.

**//<><><><><>//**